www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**A**

# Paper-II
# JOURNALISM & MASS COMMUNICATION

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................
   (Name) ................................................
2. (Signature) ..........................................
   (Name) ................................................

Seat No. | | | | | | | |
(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................
(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |
(To be filled by the Candidate)

## JUN - 19225

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (B) is the correct response.
   (A) ● (C) (D)
   Following wrong methods should not be used as they are not recognised by scanning machine in digitized assessment. Candidate using such method will be responsible for their loss.

   WRONG METHODS
   (A)(B)(C)(D) (A)(B)(C)(D) (A)(B)(C)(D) (A)(B)(C)(D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (B) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) ● (C) (D)
   खालील चुकीच्या पद्धती वापरू नये, कारण डिजिटाइज्ड (Digitized) मूल्यांकनात स्कॅनिंग मशीन त्यांना ओळखत नाही. त्या पद्धती वापरून नुकसान झाल्यास त्यास विद्यार्थीच जबाबदार असतील.

   WRONG METHODS
   (A)(B)(C)(D) (A)(B)(C)(D) (A)(B)(C)(D) (A)(B)(C)(D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in



Your Personal Exam Guide

Prepp
Your Personal Exams Guide

JUN - 19225/II—A

# Journalism & Mass Communication

## Paper II

# पत्रकारिता आणि जनसंचार

## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which newspaper in UK was caught in the controversy of hacking phones of celebrities and politicians ?
   (A) Telegraph
   (B) Guardian
   (C) The Sun
   (D) News of the World

2. In the context of media studies, what does the term "representation" mean ?
   (A) The process of creating media content
   (B) The portrayal of particular groups, communities, or ideas in media
   (C) The distribution of media products
   (D) The economic structure of media organisations in South-Asian countries

3. Who among the following theorists say that people play with media like a toy ?
   (A) James Carey
   (B) William Stephenson
   (C) George Gerbner
   (D) Albert Bandura

1. युनायटेड किंग्डममधील राजकारणी व प्रसिद्ध व्यक्तींचे फोन चोरून ऐकण्याबद्दल कोणते वृत्तपत्र वादाविवादाच्या भोवतालात सापडले होते ?
   (A) टेलिग्राफ
   (B) गार्डियन
   (C) द सन
   (D) न्यूज ऑफ द वर्ल्ड

2. माध्यम अभ्यासाच्या परिक्षेपात रिप्रेझेंटेशन म्हणजे काय ?
   (A) माध्यमातील आशय निर्मिती
   (B) विविध गट, संकल्पना, आणि समुदायांचे माध्यम आशयातील चित्रण
   (C) माध्यम उत्पादनांचे वितरण
   (D) दक्षिण आशीयायी देशातील माध्यम संस्थांची अर्थशास्त्रीय संरचना

3. लोक माध्यमांचा वापर एखाद्या खेळण्यासारखा करताना, असे प्रतिपादन पुढीलपैकी कोणत्या विचारवंताने केले ?
   (A) जेम्स कॅरे
   (B) विल्यम स्टीफन्सन
   (C) जॉर्ज गर्बनर
   (D) अल्बर्ट बांडुरा

4. Robert Hutchins' Commission report gave rise to which among the following theory ?
   (A) Free Press Theory
   (B) Soviet Media Theory
   (C) Authoritarian Theory
   (D) Social Responsibility Theory

5. Which among below is a famous district newspaper of Satara in Maharashtra ?
   (A) Sanchar
   (B) Sagar
   (C) Aikya
   (D) Gaonkari

6. Dr. Babasaheb Ambedkar published Saint Tukaram Maharaj's stanza (Abhang) in which of his newspaper's masthead ?
   (A) Mooknayak
   (B) Bahishkrut Bharat
   (C) Janata
   (D) Samata

7. Ajit Balakrishnan built which among the earliest Indian Web Portals ?
   (A) Indiaworld.com
   (B) Homeindia.com
   (C) Rediff.com
   (D) Indiatimes.com

4. रॉबर्ट हचिन्स आयोगाच्या अहवालामुळे पुढीलपैकी कोणत्या सिद्धान्ताचा उदय झाला ?
   (A) मुक्त वृत्तपत्रांचा सिद्धान्त
   (B) सोव्हिएट माध्यमे सिद्धान्त
   (C) अधिकारशाहीवादी सिद्धान्त
   (D) सामाजिक उत्तरदायित्वाचा सिद्धान्त

5. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचे 'जिल्हापत्र' म्हणून पुढीलपैकी कोणते वृत्तपत्र प्रसिद्ध आहे ?
   (A) संचार
   (B) सागर
   (C) ऐक्य
   (D) गावकरी

6. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या कोणत्या वृत्तपत्राच्या शीर्षस्थानी (मास्टहेड) संत तुकाराम महाराजांचा अभंग प्रसिद्ध केला आहे ?
   (A) मूकनायक
   (B) बहिष्कृत भारत
   (C) जनता
   (D) समता

7. अजित बालकृष्णन यांनी भारतातील प्रारंभीच्या वेबपोर्टलपैकी (संकेतस्थळे) कोणते पोर्टल सुरू केले ?
   (A) Indiaworld.com
   (B) Homeindia.com
   (C) Rediff.com
   (D) Indiatimes.com

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



8. Which among the following newspaper was first ridiculed as the 'Penny Press' ?
   (A) The Washington Post
   (B) Wall Street Journal
   (C) The New Yorker
   (D) The New York Sun

9. Who was the founder of the news agency—'Hindustan Samachar' ?
   (A) Shivaram Shankar Apte
   (B) Deendayal Upadhyaya
   (C) Govind Vallabh Pant
   (D) Chandrashekhar Azad

10. Who is the author of the book 'Checkmate : How the BJP won & lost Maharashtra' ?
   (A) Prakash Akolkar
   (B) Rajdeep Sardesai
   (C) Sudhir Suryavanshi
   (D) Ravikiran Deshmukh

11. Which theorist among the following suggested and considered the 'empathy' as a major component to be in one's personality in the process of development communication ?
   (A) Wilbur Schramm
   (B) John Lent
   (C) E.M. Rogers
   (D) Danial Lerner

8. पुढीलपैकी कोणत्या वृत्तपत्राची सर्वप्रथम 'पेनी प्रेस' म्हणून खिल्ली उडविण्यात आली ?
   (A) द वॉशिंग्टन पोस्ट
   (B) वॉल स्ट्रीट जर्नल
   (C) द न्यू यॉर्कर
   (D) द न्यूयॉर्क सन

9. 'हिंदुस्थान समाचार' या वृत्तसंस्थेचे संस्थापक कोण होते ?
   (A) शिवराम शंकर आपटे
   (B) दीनदयाळ उपाध्याय
   (C) गोविंद वल्लभ पंत
   (D) चंद्रशेखर आझाद

10. 'चेकमेट : हाऊ द बीजेपी वन अँड लॉस्ट महाराष्ट्र' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?
   (A) प्रकाश अकोलकर
   (B) राजदीप सरदेसाई
   (C) सुधीर सूर्यवंशी
   (D) रविकिरण देशमुख

11. विकास संज्ञापनाच्या प्रक्रियेत, सहभागी होताना सहभागकर्त्याच्या व्यक्तिमत्त्वातील 'एम्पथी' (सह-अनुभूती) हा महत्त्वाचा घटक असतो. हे प्रतिपादन कोणत्या सैद्धान्तिकाने केले आहे ?
   (A) विल्बर श्रॅम
   (B) जॉन लेन्ट
   (C) ई.एम. रॉजर्स
   (D) डॅनीयल लर्नर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**Q. Nos. 12-14 :**

Read the following abridged version of DG. Phalke and Melies Tradition in Early Indian Cinema by Suresh Chabria (1993) and answer the following questions :

The staple genre and mainstay of the Indian silent film Industry (1913-1931) was the mythological film which is particular to Indian Cinema but has some affinities with the biblical or religious epic film of the west. Both these genres deal with the great religious narratives of their respective traditions. However, while the biblical film, both in Italy and Hollywood relied more on the spectacular scale of the sets & mass scenes. The Indian mythological evolved into magic oriented genre. The typical mythological film direct a fashion the religious narratives we call 'mythology' but the iconography and other qualities makes mythologicals full of events and imagery like gods coiled, gods with multiple heads holding formidable weapons and tame storms and seas.

Thus, while the western biblical film easily crosses over into the historical genre, in the Indian mythological film is ever present like an invisible mentor, the great monstrative genius of the early film form, Georges Melies.

**प्र. क्र. 12-14 :**

डी.जी. फाळके अँड मेलीज ट्रॅडिशन इन अर्ली इंडियन सिनेमा' या सुरेश छाब्रिया (1993) यांच्या पुस्तकातील पुढील परिच्छेद वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा :

भारतातील मूकपटांच्या जमान्यातील (1913-1931) चित्रपटांचा आशय प्रामुख्याने पौराणिक कथांवर आधारित राहिला. भारतीय चित्रपटसृष्टीचे हे एक वैशिष्ट्य राहिले आहे. मात्र, त्याचवेळी बायबल आणि पाश्चिमात्याच्या धार्मिक कथा व महाकाव्यांशी त्यांची जवळीक राहिली. हे दोन्ही आशयप्रकार (रूपबंध) त्यांच्या परंपरामधील धार्मिक तत्त्वज्ञान आणि कथनाशी जोडलेले आहेत. मात्र, इटली असो किंवा हॉलीवूडमध्ये निर्मिती झालेल्या बायबलवर आधारित चित्रपटांचा भर भव्य नेपथ्य (सेट) आणि मोठ्या गर्दीचा समावेश असलेल्या समूहदृश्यांवर राहिला. भारतातील पौराणिक चित्रपटांचा कल मात्र यातील अद्‌भुत आणि मोठ्या पडद्यावरील जादू साकारण्याकडे राहिला. सर्वसाधारण पौराणिक चित्रपटात एखाद्या मिथकाभोवती गुंफलेल्या धार्मिक समजुती व प्रस्थापित वैचारिक कथन दाखवले जाते. त्याचवेळी धार्मिक-सांस्कृतिक प्रतिमान प्रतीकांचा खेळ, वेगवान नाट्यमय घडामोडी या चित्रपटांत रंजकता आणते. अनेक रूपांच्या एकाच देहावर अनेक मस्तके धारण करणाऱ्या शस्त्रधारी देव देवता त्यात महासागरासारख्या नैसर्गिक शक्ती, वादळे सहजपणे नियंत्रित करताना दिसतात. या पार्श्वभूमीवर बायबलवर आधारित पाश्चात्य चित्रपट सहजपणे ऐतिहासिक चित्रपटांच्या प्रकारात समाविष्ट होतात. मात्र, भारतीय पौराणिक चित्रपटांत जॉर्जेस मेलीजच्या प्रतिमासृष्टीप्रमाणे एखाद्या अदृश्य महाकाय शस्त्रीचा वापर एखाद्या मार्गदर्शकाप्रमाणे सतत वावरत असलेला जाणवतो.

Prepp
Your Personal Exams Guide



12. How did the Indian mythological film differ from the western biblical film in terms of presentation ?
    (A) Indian mythological films focused on historical accuracy
    (B) Western biblical films relied more on special effects
    (C) Biblical western films emphasized on natural story telling
    (D) Indian mythological films primarily used events and imagery of gods

13. What features distinguished the Indian Mythological from western biblical in terms of visual effects ?
    (A) Western biblicals relied on inventive charm
    (B) Indian mythologicals used mass scenes & extras
    (C) Indian mythologicals employed a magic genre with iconography
    (D) Western biblicals emphasized direct narratives

12. सादरीकरणाच्या संदर्भात भारतीय पौराणिक चित्रपट पाश्चात्य बायबल आधारित चित्रपटांपेक्षा वेगळे कसे ठरतात ?
    (A) भारतीय पौराणिक चित्रपट ऐतिहासिक तथ्यांवर भर देतात
    (B) पाश्चात्य बायबल आधारित चित्रपट विशेष तंत्र परिणामांना (स्पेशल इफेक्ट्स) महत्त्व देतात
    (C) बायबल आधारित पाश्चात्य चित्रपट नैसर्गिकरित्या कथा सादरीकरणाच्या प्रयत्न करतात
    (D) भारतीय पौराणिक चित्रपट प्रसंग आणि देव देवतांच्या प्रतिमानिर्मितीला प्राधान्य देतात

13. दृश्य परिणामांच्या दृष्टीने भारतीय पौराणिक चित्रपट पाश्चात्य बायबल आधारित चित्रपटांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण कसे ठरतात ?
    (A) पाश्चात्य बायबल आधारित चित्रपट नावीन्यपूर्ण सादरीकरणावर भर देतात
    (B) भारतीय पौराणिक चित्रपटांच्या समूहदृश्यांवर भर असतो
    (C) भारतीय पौराणिक चित्रपट प्रतिमासृष्टीबरोबरच उद्‌भुत दाखविण्याचा प्रयत्न करतात
    (D) पाश्चात्य बायबल आधारित चित्रपट थेट कथनावर भर देतात

14. What significant role does Georges Melies play in the Indian mythological film according to the paragraph ?

(A) He directed several Indian mythologicals

(B) He influenced the use of special effects in Indian mythological films

(C) He was a major actor in the silent film industry

(D) He introduced mass scenes in Indian mythological films

15. Which of the following biases impacted Post World War II development projects ?

(A) Pro-rich, Pro-capitalist, Pro-persuasion

(B) Pro-poor, Pro-freedom, Pro-participation

(C) Pro-development, Pro-mass media, Pro-poor

(D) Pro-literacy, Pro-innovation, Pro-mass media

16. Which Brazilean educator wrote a book 'Pedagogy of the Oppressed' ?

(A) Father Jose de Anchieta

(B) Paolo Freire

(C) Jairton Dupont

(D) Joaquim Maria Machado

17. Whom did British rulers describe as 'Father of Indian Unrest' ?

(A) Mahatma Gandhi

(B) Bal Gangadhar Tilak

(C) Dr. B. R. Ambedkar

(D) Mahatma Jyotiba Phule

14. या उताऱ्यावरून भारतीय पौराणिक चित्रपटांवरील जॉर्जेस मेलीज यांचा परिणाम कसा दिसतो ?

(A) त्याने अनेक भारतीय चित्रपटांचे दिग्दर्शन केले

(B) भारतीय चित्रपटांमधील विशेष तंत्रपरिणामांच्या सादरीकरणावर त्याचा प्रभाव आहे

(C) मूकपटांच्या काळातील जो एक महत्वाचा अभिनेता होता

(D) भारतीय पौराणिक चित्रटांत समूहदृश्यांची सुरुवात त्याने केली

15. दुसऱ्या महायुद्धानंतर राबविल्या गेलेल्या विकासप्रकल्पांवर कोणत्या पूर्वाग्रहांचा प्रभाव होता ?

(A) धनिक धार्जिणे, भांडवलशाही धार्जीणे, प्रचार धार्जीणे

(B) गरीब धार्जिणे, स्वातंत्र्य धार्जीणे, सहभाग धार्जीणे

(C) विकास धार्जीणे, माध्यम धार्जीणे, गरीब धार्जीणे

(D) साक्षरता धार्जीणे, नवप्रवर्तन धार्जीणे, माध्यम धार्जीणे

16. 'पॅडागॉगी ऑफ द ऑप्रेस्ड' हे पुस्तक कोणत्या ब्रासिलियन शिक्षणतज्ञाने लिहिले आहे ?

(A) फादर जोस दे अंचेता

(B) पाउलो फ्रियर

(C) जेरतॉँ द्युपाँत

(D) जोक्वीम मारीया मचाडो

17. 'भारतीय असंतोषाचे जनक' ही उपमा ब्रिटीश राज्यकर्त्यांनी कोणत्या भारतीय व्यक्तीकरिता वापरली होती ?

(A) महात्मा गांधी

(B) बाळ गंगाधर टिळक

(C) डॉ. बी.आर. आंबेडकर

(D) महात्मा ज्योतीबा फुले

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



18. Which of the following was used in the initial stages of use of television for development communication to reach out to the rural audiences ?

(A) Satellite stations

(B) OB Vans

(C) Community TV sets

(D) Radio clubs

19. Which of the following theory refers to information and influence transmitted from mass media to mass audiences through mediation of opinion leaders ?

(A) Uses & gratification theory

(B) Two step flow theory

(C) Agenda setting theory

(D) Transmission theory

20. Mc Bride Commission was appointed by UNESCO in 1977 to study world communication problems with special stress on internal implication of the modern media. What was the title of the report of the commission ?

(A) New World Communication Order

(B) Alternative Voices of the World

(C) Many Voices, One World

(D) New Communication Future of the World

18. विकास संज्ञापनात, ग्रामीण लोकांपर्यंत माहिती पोहचविण्याकरिता दूरचित्रवाणीच्या कलेल्या वापरात पुढीलपैकी कोणता घटक सुरुवातीच्या टप्प्यांमध्ये वापरला गेला होता ?

(A) उपग्रह स्थानक

(B) ओबी व्हॅन

(C) सामुयादिक दूरचित्रवाणी संच

(D) नभोवाणी गट

19. पुढीलपैकी कोणत्या सिद्धांतात, माध्यमांकडून प्रसारित केलेली माहिती ग्राहकांकडे थेट न जाता तिचे नियमन मतांग्रणींकडून केले जाते, असा विचार मांडला आहे ?

(A) उपयोग आणि संतुष्टी सिद्धांत

(B) दोन पायऱ्यांचा सिद्धांत

(C) अग्रक्रम निश्चिती सिद्धांत

(D) प्रक्षेपण सिद्धांत

20. वैश्विक संज्ञापनात, विशेषत: आधुनिक माध्यमांमुळे निर्माण होणाऱ्या अंतस्थ: समस्यांचा अभ्यास करण्याकरिता युनेस्कोने 1977 साली मॅकब्राईड आयोगाची स्थापना केली. या आयोगाच्या अहवालाचे शीर्षक काय होते ?

(A) न्यू वर्ल्ड कम्युनिकेशन ऑर्डर

(B) अल्टरनेटिव्ह व्हाईसेस ऑफ द वर्ल्ड

(C) मेनी व्हाईसेस, वन वर्ल्ड

(D) न्यू कम्युनिकेशन फ्युचर ऑफ द वर्ल्ड

21. Which FM Radio Channel hosts the 'Rainbow Diaries' LGBTQ Podcast ?
(A) Radio City
(B) Radio Mirchi
(C) Red FM
(D) Radio Mirchi Love

22. Considering the argument by E.M. Rogers about Innovation, which of the following options is not the stage for the innovation process ?
(A) Digital inclusion
(B) Diffusion through social system
(C) Invention
(D) Time

23. Nora Cruz Quebral Clearly accounted that development communication was first articulated on 10th Dec 1971 at the :
(A) University of Colombo
(B) University of Phillippines in Los Baos
(C) National University of Singapore
(D) Chiang Mai University

24. In TV news production what is the primary purpose of a 'lower third' graphic ?
(A) To display the channel logo continuously
(B) To provide additional information or context about the news being presented
(C) To show the main headline throughout the broadcast
(D) It is used only for advertising purpose

21. पुढीलपैकी कोणते हे खाजगी नभोवाणी केंद्र 'रेनबो डायरीज' या एलजीबीटीक्यू समुदायवर आधारित पॉडकास्टचे प्रसारण करते ?
(A) रेडीओ सिटी
(B) रेडीओ मिर्ची
(C) रेड एफएम
(D) रेडीओ मिर्ची लव्ह

22. इ.एम. रॉजर्स यांचे इनोवेशन (नवप्रवर्तन) बद्दलचे विचार लक्षात घेता, पुढीलपैकी कोणता पर्याय नवप्रवर्तनाचा टप्पा दर्शवित नाही ?
(A) डिजीटल इन्क्लुजन (अंकीय समावेशन)
(B) डिफ्यूजन थ्रू सोशल सिस्टीम (सामाजिक व्यवस्थेतून होणारे प्रसारण)
(C) इन्व्हेंशन (नवनिर्माण)
(D) टाईम (वेळ)

23. नोरा क्रुज क्वेब्राल यांनी कथन केल्यानुसार, विकास संज्ञापनाची संकल्पना 10 डिसेंबर 1971 रोजी कोणत्या ठिकाणी वर्णिली गेली ?
(A) कोलंबो विद्यापीठ
(B) लास बाओस स्थित फिलीपाईन्स विद्यापीठ
(C) सिंगापोर राष्ट्रीय विद्यापीठ
(D) चियांग माई विद्यापीठ

24. दूरचित्रवाणीच्या वृत्तनिर्मितीमध्ये खालील बाजूच्या एक तृतीयांश (लोअर थर्ड) प्राथमिक उद्देश कोणता असतो ?
(A) दूरचित्रवाणी वाहिनीचा लोगो सतत दाखवत राहणे
(B) सादर होत असलेल्या बातमीसंबंधी अतिरिक्त माहिती वा संदर्भ पुरवणे
(C) संपूर्ण प्रसारणादरम्यान मुख्य बातमी (हेडलाइन) दाखवत राहणे
(D) फक्त जाहिरातींसाठी या जागेचा वापर करणे

25. Who is one of the authors of MOJO : The Mobile Journalism Hand-book ?
(A) Bruce Westley
(B) Stephen Quiaun
(C) Rajdeep Sardesai
(D) Barkha Dutt

26. In journalism 'The Overton Window' is a concept that refers to :
(A) The range of ideas tolerated in Public Discourse
(B) The physical space in new rooms where brainstorming occurs
(C) A specific type of computer software used for news editing
(D) The time frame in which news remains relevant

27. Who is the Author of 'Whole Numbers and Half Truths' ?
(A) Vanita Kohli-Khandekar
(B) Rukmini S
(C) Tavleen Singh
(D) Barkha Dutt

28. The concept of 'News deserts' is primarily concerned with :
(A) Areas with abundant, diverse news coverage
(B) Regions with limited or no access to local news
(C) Urban areas with high concentration of news outlets
(D) The impact of climate change on news reporting

25. 'मोजो : द मोबाईल जर्नालिझम हँडबुक' या पुस्तकाचे लेखक पुढीलपैकी कोण आहेत ?
(A) ब्रुस वेस्ले
(B) स्टीफन क्विन
(C) राजदीप सरदेसाई
(D) बरखा दत्त

26. पत्रकारितेमध्ये 'ओव्हर्टन विंडो' या संकल्पनेतून काय सूचित केले जाते ?
(A) सार्वजनिक चर्चा विश्वात प्रस्तुत होणाऱ्या कल्पनांची व्याप्ती
(B) वृत्तदालनात नव्या कल्पनांची चर्चा करण्याची प्रत्यक्ष जागा
(C) वृत्तसंपादनासाठी वापरले जाणारे विशिष्ट प्रकारचे सॉफ्टवेअर
(D) बातमीची उपयुक्तता कायम राहण्याचा विशिष्ट कालावधी

27. 'होल नंबर्स अँड हाफ ट्रूथ' या पुस्तकाच्या लेखिका कोण ?
(A) वनिता कोहली-खांडेकर
(B) रूक्मिणी एस
(C) तवलीन सिंग
(D) बरखा दत्त

28. 'न्यूज डेझर्टस्' ही संज्ञा प्रामुख्याने कशाशी संबंधित आहे ?
(A) मोठ्या प्रमाणात व वैविध्यपूर्ण वार्तांकन होत असलेला प्रदेश
(B) स्थानिक बातम्यांची अत्यल्प उपलब्धी असलेला किंवा संपूर्ण अभाव असलेला प्रदेश
(C) वृत्तमाध्यमे मुबलक प्रमाणात असलेला नागरी प्रदेश
(D) हवामान बदलाचा वार्तांकनावर होणारा परिणाम

29. 'News Framing' in Journalism refers to :
   (A) The physical layout of a newspaper
   (B) How journalists shape the presentation of a news story
   (C) The process of editing video footage
   (D) Framing photographs for news article

30. What is 'Parachute Journalism' often criticized for ?
   (A) It's in depth and comprehensive coverage of local issues
   (B) Sending reporters to cover stories in areas where they have little local knowledge
   (C) Its focus on long-term assignments for journalists
   (D) Being overly cautions in reporting sensitive issues

31. Which of the following is an alternative to the 'Inverted Pyramid' writing structure ?
   (A) Diamond
   (B) Platinum
   (C) Gold
   (D) Silver

32. What does the term 'hyper local' refer to in the context of Digital Journalism ?
   (A) Global news coverage
   (B) News focused on a very specific community-level geographic area
   (C) Reporting only on national events
   (D) Reporting only district level events

29. पत्रकारितेत 'न्यूज फ्रेमिंग' या संज्ञेने काय सूचित केले जाते ?
   (A) वृत्तपत्राची प्रत्यक्ष मांडणी
   (B) एखाद्या बातमीचे सादरीकरण पत्रकार विशिष्ट दृष्टिकोनातून करतात
   (C) व्हीडिओ दृश्यांचे संकलन करण्याची विशिष्ट प्रक्रिया
   (D) वृत्तलेखांसाठी छायाचित्रांची चौकट सजवणे

30. 'पॅराशूट जर्नालिझम' वर नेहमी कशासाठी टीका केली जाते ?
   (A) यात स्थानिक प्रश्नांचे सखोल व सविस्तर वार्तांकन केले जाते
   (B) स्थानिक परिस्थितीचे अत्यल्प ज्ञान असलेल्या बातमीदारांना वार्तांकनासाठी पाठवले जाते
   (C) पत्रकारांसाठी दीर्घकालीन वार्तांकनाच्या घटनांवर त्यात भर दिला जातो
   (D) संवेदनशील विषयांचे वार्तांकन करताना अति प्रमाणात दक्षता घेतली जाते

31. बातमीलेखनाच्या 'उलटा त्रिकोण' पद्धतीला पर्यायी लेखनाचा रूपबंध कोणता ?
   (A) हीरक
   (B) प्लॅटिनम
   (C) सुवर्ण
   (D) रौप्य

32. डिजिटल पत्रकारितेच्या संदर्भात 'हायपरलोकल' ही संज्ञा काय सूचित करते ?
   (A) जागतिक पातळीवर वार्तांकन करणे
   (B) विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील समुदायांसंबंधी वार्तांकन करणे
   (C) फक्त राष्ट्रीय पातळीवर वार्तांकन करणे
   (D) फक्त जिल्हा पातळीवरील घटनांचे वार्तांकन करणे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



33. Which were the innovation characteristics as described by Everett Rogers ?
   (A) Relative advantage, compatibility triability
   (B) Benefits, evidence, trial
   (C) Applicability, Relevance, Usefulness
   (D) Evidence, Feasibility, Benefits

34. 'Above The Line' (ATL) advertising is characterized by :
   (A) Personalized, one-on-one interaction with consumers
   (B) Direct marketing techniques that involves specific targeting
   (C) Exclusive use of digital marketing channels
   (D) Its use of unmeasurable and non-targeted mass media methods

35. Advertisements generally leverage a Product's USP which is :
   (A) The legal right a product or brand possess
   (B) The total budget allocated for the ad campaign
   (C) The distinctive feature that sets the product apart from competitors
   (D) The unique strategic plan devised by the agency

33. एव्हरेट रॉजर्स यांनी मांडल्याप्रमाणे इनोव्हेशनची (नवप्रवर्तनाची) लक्षणे कोणती ?
   (A) सापेक्ष लाभ, सुसंगतता, चाचणी योग्य
   (B) लाभ, पुरावा, चाचणी
   (C) उपयोगिता, प्रासंगिकता, उपयुक्तता
   (D) पुरावा, व्यवहार्यता, लाभ

34. 'एबोव्ह द लाईन' (एटीएल) जाहिरातीचे लक्षण कोणते ?
   (A) वैयक्तिक, ग्राहकांबरोबर होणारी एकास एक आंतरक्रिया
   (B) विशिष्ट जनसमुदायास डोळ्यासमोर ठेऊन केलेले थेट विपणन
   (C) डिजीटल मार्केटिंग चॅनल्सचा केलेला वापर
   (D) ज्यांचे मापन करता येणे शक्य नाही अशा जनमाध्यम पद्धतींचा वापर करून लोकांप्रर्यंत पोहोचण्याचा केलेला प्रयत्न

35. जाहिरातींमध्ये सामान्यपणे एखाद्या उत्पादनाच्या अनन्यसाधारण विक्री लक्षणाचा (यूएसपी) उपयोग केला जातो. त्यातून काय सूचित होते ?
   (A) विशिष्ट उत्पादन किंवा नाममुद्रेचा कायदेशीर हक्क
   (B) जाहिरात मोहिमेसाठी मान्य झालेला एकूण खर्च
   (C) स्पर्धकांपासून एखादे उत्पादन उठून दिसेल असे वैशिष्ट्य
   (D) जाहिरात संस्थेने आखलेला-युनिक स्ट्रॅटेजिक प्लॅन (वैशिष्ट्यपूर्ण योजना)

www.prepp.in



36. Which theory in advertising focuses on the idea that consumers pass through a cognitive and affective phase before adopting a behaviour ?
(A) The AIDA model
(B) The Hierarchy-of-Needs Theory
(C) The Elaboration Likelihood Model
(D) The Balance Theory

37. Which of the following celebrities was not a part of the Chitale Bandhu's My Chitale Bakarwadi Ad Campaign ?
(A) Amey Wagh
(B) Nagraj Manjule
(C) Jackie Shroff
(D) Mahesh Manjrekar

38. Find the odd one out—Ogilvy India, DDB Mudra Group, Dentsu, Justwords :
(A) DDB Mudra Group
(B) Ogilvy India
(C) Dentsu
(D) Justwords

39. 'Men Will be Men' campaign is an example of :
(A) Guerilla Advertising
(B) Covert Advertising
(C) Subliminal Advertising
(D) Surrogate Advertising

40. The post modern era of advertising can be characterized by :
(A) Limited and Expensive media channels
(B) Fragmentation, Diversity & Niche Targeting
(C) Standardized Messages and Mass Production
(D) Adherence to traditions and strict cultural norms

36. एखादे वर्तन करण्यापूर्वी ग्राहकाच्या आकलनाच्या पातळीवर बदल घडवले जातात वा जाऊ शकतात, ही कल्पना जाहिरातीच्या कोणत्या सिद्धांतात प्रतिबिंबित होते ?
(A) AIDA प्रतिमान
(B) गरजांची अधिश्रेणी सिद्धान्त
(C) इलॅबोरेशन लाइक्लीहूड (शक्यता स्पष्टीकरण) सिद्धान्त
(D) संतुलन सिद्धान्त

37. चितळे बंधूंच्या 'माय चितळे बाकरवडी' जाहिरात मोहिमेत पुढीलपैकी कोणत्या मान्यवर व्यक्तींचा सहभाग नव्हता ?
(A) अमेय वाघ
(B) नागराज मंजुळे
(C) जैकी श्रॉफ
(D) महेश मांजरेकर

38. ऑगिल्वी इंडिया, डीडीबी मुद्रा समूह, देंतसू, जस्टवर्ड्स यातील गटाशी विसंगत घटक ओळखा :
(A) डीडीबी मुद्रा समूह
(B) ऑगिल्वी इंडिया
(C) देंतसू
(D) जस्टवर्ड्स

39. 'मेन विल बी मेन' मोहीम हे कशाचे उदाहरण आहे ?
(A) गुरिल्ला ॲडव्हर्टायजिंग
(B) कोव्हर्ट ॲडव्हर्टायजिंग
(C) सबलिमिनल ॲडव्हर्टायजिंग
(D) सरोगेट ॲडव्हर्टायजिंग

40. जाहिरात क्षेत्रातील उत्तर-आधुनिक युगाची वैशिष्ट्ये कोणती ?
(A) मर्यादित आणि महागड्या माध्यम वाहिन्या
(B) विखंडन, वैविध्य आणि विषयविशिष्ट लक्ष्य
(C) प्रमाणित संदेश आणि मोठ्या प्रमाणात निर्मिती
(D) परंपरांशी संलग्नता आणि सांस्कृतिक नियमांचे कठोर पालन

Prepp
Your Personal Exams Guide



41. Subtle and casual tactics used to build a relationship with potential buyer over time, eventually persuading to make a purchase is known as :
   (A) Subtle Sell
   (B) Soft Sell
   (C) Shrewed Sell
   (D) Smart Sell

42. DAGMAR stands for :
   (A) Defining Advertising goals for Measured Advertising Results
   (B) Defining Advertising Goals for Mean Advertising Results
   (C) Defining Advertising Goals for Measured Awareness Results
   (D) Defining Awareness Goals for Medium Advertising Results

43. Ambush marketing is a strategy where a brand :
   (A) Collaborates with competitors willingly for joint advertising and marketing campaign
   (B) Avoids all forms of advertising during major events
   (C) Associates itself with an event without paging for sponsorship, often capitalizing in the event's publicity
   (D) Focuses solely on direct product promotion without involving in traditional advertising method

41. संभाव्य ग्राहकाशी विशिष्ट कालावधीत अनौपचारिक पद्धतीने सहज मैत्री करून त्याला एखादी गोष्ट खरेदी करण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या तंत्राला काय संबोधले जाते ?
   (A) तरल विक्री (सरल सेल)
   (B) मृदू विक्री (सॉफ्ट सेल)
   (C) चाणास विक्री (श्रुड सेल)
   (D) स्मार्ट विक्री (स्मार्ट सेल)

42. DAGMAR चे पूर्ण रूप कोणते ?
   (A) डिफायनिंग ॲडव्हर्टायजिंग गोल्स फॉर मेजर्ड ॲडव्हर्टायजिंग रिझल्ट्स
   (B) डिफायनिंग ॲडव्हर्टायजिंग गोल्स फॉर मीन ॲडव्हर्टायजिंग रिझल्ट्स
   (C) डिफायनिंग ॲडव्हर्टायजिंग गोल्स फॉर मेजर्ड अवेअरनेस रिझल्ट्स
   (D) डिफायनिंग अवेअरनेस गोल्स फॉर मीडियम ॲडव्हर्टायजिंग रिझल्ट्स

43. 'अँबुश मार्केटिंग' ही एक रणनीती आहे ज्यात एखादी नाममुद्रा (ब्रँड) :
   (A) जाहिरात व विपणनाच्या संयुक्त मोहिमेसाठी स्पर्धकांबरोबर सहकार्य करणे
   (B) महत्त्वांच्या घटनांदरम्यान कोणत्याही प्रकारच्या जाहिराती करणे टाळते
   (C) एखाद्या घटनेचे समारंभाचे प्रायोजकत्व न घेता त्याच्या प्रसिद्धीतून फायदा मिळवते
   (D) पारंपारिक जाहिरात पद्धतीचा वापर न करता केवळ थेट उत्पादन जाहिरातीवर लक्ष केंद्रित करते

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



44. A film concerned more with its artistry than ideology :
    (A) Realistic film
    (B) Montage
    (C) Formalistic film
    (D) Kino-glaz

45. The television based theory which George Gerbner proposed that over a period of time, the versions of the world presented by television begin to dominate the symbolic realities of audiences, attitudes, opinions and understandings :
    (A) Cultural Capital
    (B) Cultivation theory
    (C) Cultural Imperialism
    (D) Culture Industry

46. Which Director is known for his work on superhero films such as "The Dark Knight" trilogy in the 2000s ?
    (A) Steven Spielberg
    (B) Christopher Nolan
    (C) Quentin Tarantino
    (D) Martin Scorses

47. Luka Chupi bahut hui ......... one of the most popular Hindi song in Rang de Basanti was written by :
    (A) Guljar
    (B) Prasoon Joshi
    (C) Javed Akhter
    (D) Kavi Neeraj

44. कोणत्याही विचारधारेपेक्षा, कलाघटकांवर अधिक अवधारण/जोर देण्याऱ्या चित्रपटास काय संबोधले जाते ?
